पलायन आणि इतर कथा

अँतन चेरवॉव्ह



पलायन आणि इतर कथा

मूळ लेखक : अँतन चेखोव

रूपांतर: चित्रा नाईक

अनौपचारिक शिक्षण साधनकेंद्र, महाराष्ट्र,
इंडिअन इन्स्टिट्यूट ऑफ एजुकेशन,
जे. पी. नाईक पथ, १२८/२, कोथरूड,
पुणे ४११ ०२९.

प्रस्तावना

अँतन चेखॉव्ह हा रशियामधला एक प्रसिद्ध विचारवंत आणि लोकप्रिय लेखक. त्याचे साहित्य जगातील अनेक भाषात अनुवादित झाले आहे. त्याच्या काही कथा-कादंबऱ्यांवर उत्तम नाटकेही आधारली गेली आहेत. चेखॉव्हच्या मनामध्ये गरीब लोकांविषयी अतिशय खोल सहानुभूती होती. त्यातही त्या काळातल्या रशियन समाजामध्ये ग्रामीण भागातील लहान मुलांच्या जीवनावर गरीबीचा जो भयानक परिणाम झालेला आढळे, त्याने चेखॉव्हचे मन अस्वस्थ होत असे. 'पलायन आणि इतर कथा' ह्या संग्रहामध्ये वाचकांना चेखॉव्हच्या ह्या अस्वस्थतेचा अनुभव येईल. चेखॉव्हच्या कथांमध्ये आढळणाऱ्या गरीब मुलांसारखीच लक्षावधी मुले आज भारतातही आहेत. त्यांचे भवितव्य सुधारण्याचा विचार ह्या कथांमुळे वाचकांच्या मनात उभा राहिला तर तो एक समाधानाची बाब ठरेल.

चित्रा नाईक

पलायन



पाश्काची आई त्याला घेऊन पहाट होण्याआधीच गावाहून इस्पितळाकडे तपासणीसाठी निघाली होती. वाट संपता संपेना. पावसाची सारखी धार लागली होती. मायलेक भिजून चिंब झाले. आधी वैराण माळातून आणि नंतर झाडीतल्या निसरड्या पायवाटेतून जाता जाता शेवटी इस्पितळ आले. एकदाची पहाट झाली. तरी पण इस्पितळाची ओसरी अजून अंधारलेलीच होती. मधला दरवाजा बंद होता. ओसरीवर जरा ऊबदार वाटत होते. पण वाऱ्याचा झोत आला की पावसाचे थेंब आतपर्यंत घुसायचेच. हळूहळू बरेच रोगी तिथे दाखल झाले. पाश्का आणि त्याची आई गर्दीतून पुढे सरकले. आईला बिलगून पाश्का उभ्याउभ्याच झोपी गेला.

दोन तास वाट पाहिल्यावर आतल्या हॉलचे दार उघडले. रोगी आत जाऊन बाकड्यावर बसले. सगळे गप्प, गंभीर! पाश्का त्यांच्याकडे पाहात होता. जराशाने एक मुलगा एका पायावर लंगडत आत आला. पाश्का हळूच आईला म्हणाला, ''आई, तो बघ चिमणीसारख्या उड्या मारतोय!'' कंटाळलेली आई म्हणाली, ''गप्प बस. बडबड करू नकोस!''

आतल्या भिंतीतली एक खिडकी उघडली. कंपाऊंडरने रोग्याचे नाव-गाव, वय, आजार लिहून घ्यायला सुरुवात केली. तिथे आईने जे सांगितले त्यावरून पाश्काला कळले की त्याचे पूर्ण नाव होते पावल गालाक्तिओनोफ, त्याचे वय सात वर्षे आणि तो ईस्टरच्या सणापासून आजारी झाला होता.

नावनोंदणी चालू असतानाच डॉक्टर तिथे आले. लंगड्या पोराजवळ थांबून ते रागावल्यासारखे म्हणाले, ''तू अगदी गाढव आहेस! खरोखर गाढव आहेस! अरे, मी तुला सोमवारी बोलावलं होतं आणि आज उजाडलाय शुक्रवार. माझं काही जात नाही. तुला तो पाय गमवावा लागेल.''

ते पोर गयावया करत डॉक्टरांचे नाव घेऊन म्हणाले, ''ईव्हान निकोलाईच, दया करा माझ्यावर!'' डॉक्टर त्याला वेडावत म्हणाले, ''ईव्हान निकोलाईच! तू अगदी गाढव आहेस. मी सोमवारी म्हटलं तर सोमवारीच आलं पाहिजे. डॉक्टरांचा हुकूम पाळला पाहिजे!''

डॉक्टर आपल्या खोलीत जाऊन टेबलाशी बसले. नावाच्या यादीनुसार एकेका रोग्याला आत बोलावू लागले. एखादे आजारी पोर तपासताना रडायला लागे. डॉक्टर ओरडत, ''गप्प बस! मी काही जीव नाही घेणार तुझा!'' पाश्काचे नाव डॉक्टरांनी पुकारले. आई त्याला आत घेऊन गेली. ''काय होतंय ह्याला?'' डॉक्टरांनी विचारले.

''ह्याच्या कोपरावर मोठं गळू झालंय, डॉक्टरसाहेब!'' ती म्हणाली.

''त्याचे कपडे काढा,'' डॉक्टरांनी फर्मावले.

पाश्काने आपल्या हाताने गळपट्टा सोडला, गरम कोटाची बटने काढायला सुरुवात केली. डॉक्टर त्याच्या आईला ओरडले, ''बाई, तुम्ही काय पाहुण्या आलात की काय इथं? झटपट काढा त्याचे कपडे. बाहेर खूप लोक थांबलेत!''

कपडे भराभर निघाले. पाश्काच्या फुगीर पोटावर डॉक्टरांनी टिचकी मारली. ते म्हणाले, ''पाश्काभाऊ, हे काही ठीक नाही. पण असू देत. तुझं कोपर मला दाखव.'' पाश्का भ्याला आणि रडायला लागला. डॉक्टर चेष्टेने म्हणाले, ''अरे, अरे! ह्या वयात रडतोस? तुझं तर लग्न करायचं वय झालंय!'' ते ऐकून पाश्का रडायचा थांबला. डॉक्टरांनी त्याचे कोपर तपासले. ते पाश्काच्या आईला म्हणाले, ''तुम्हाला खरोखर फटके मारायला हवेत. त्याला ह्याआधी का नाही आणलंत? त्याच्या कोपराच्या हाडांपर्यंत रोग पसरला आहे. कापू का हात त्याचा?''

पाश्काची आई गोंधळून म्हणाली, ''तुम्ही ठरवायचं, डॉक्टरसाहेब!''

डॉक्टर रागाने ओरडले, ''डॉक्टरसाहेब, डॉक्टरसाहेब! पोराचा दंड कुजतोय आणि म्हणे 'डॉक्टरसाहेब'. तुम्हा वडीलधाऱ्यांच्या नाकावर बारीक फोड आला तरी तुम्ही इथे पळत येता उपचारासाठी. पण आपल्या पोरांचा आजार सहा सहा महिने कुजवता! त्याचा हात दंडापासून गेला तर? मोठा झाल्यावर तो काम कसा करेल? अडाणी माणसं आहात तुम्ही!''

डॉक्टरांनी सिगरेट शिलगावली. पाश्काच्या आईवर आणखी थोडी आगपाखड केली. बराच विचार केला. मग ते शांतपणे म्हणाले, ''बाई, आता ह्यावर मलम आणि गोळ्या-काढ्याचा उपचार निरुपयोगी ठरेल. त्याला इथे इस्पितळात ठेवून जा! ऑपरेशन केलं पाहिजे. पाश्का,



ऐकलंस का?'' पाश्का गडबडून गेला.

पाश्काच्या खांद्यावर हात ठेऊन डॉक्टर म्हणाले, ''पाश्काभाऊ, एकदोन दिवस इथे आमच्याकडे राहायचं. आई परत जाईल. इथे गंमत आहे. पलीकडे रास्पबेरीची झुडपं आहेत. इथे गाणारे पक्षी येतात. आपण एखादा गाणारा पक्षी पकडू. मी तुला जंगलातला कोल्हा पण दाखवीन. कबूल? आईला जाऊ देत.''

''पाश्का, तू राहा इथे, डॉक्टर सांगतायत तसं!'' आई म्हणाली.

''तो राहाणारच आहे,'' डॉक्टर गमतीने म्हणाले, ''तो बरा झाला की आम्ही हिंडायला जाऊ. मी त्याला खराखुरा कोल्हा दाखवीन. आम्ही जत्रेला पण जाऊ. तिथे गोडगोड गोळ्या विकत घेऊ.'' त्यांनी नर्सला हाक मारली, ''मार्या देनिसोव्हना, ह्याला वर घेऊन जा!''

पाश्काच्या डोक्यात गोंधळ उडाला. डॉक्टर मोठे विनोदी गृहस्थ होते. पाश्काला ते आवडले. तो कधी जत्रेला गेला नव्हता. त्याला खराखुरा, जिवंत कोल्हा पाहायचा होता, पण आई? तिच्याबद्दल काही बोलायच्या आधीच मार्याने त्याला हाताला धरून वर नेले. पाश्का 'आ' वासून इकडेतिकडे पाहात होता. जिना, जमीन, दरवाजे सगळे काही स्वच्छ पिवळसर रंगाचे होते. सगळीकडे दिवे होते. जमिनीवर गालिचे होते. एका भिंतीतून कितीतरी चकचकीत पितळी नळ रांगेने डोकावत होते.

पाश्काला त्याचा बिछाना फारच आवडला. त्याने गादी आणि उशी चाचपून पाहिली. बिछान्यावरची चादर आणि त्यावर घातलेला राखाडी पलंगपोस पाहून तो खूष झाला. डॉक्टरांचे घर फारच छान आहे असे त्याचे पक्के मत झाले.

त्या छोट्या वॉर्डमध्ये फक्त तीन खाटा होत्या. पहिली मोकळी होती. दुसरी पाश्काची. तिसरीवर एक म्हातारा माणूस बसून खोकत होता. एका डब्यात थुंकत होता. पाश्काला तिथून शेजारचा वॉर्ड दिसत होता. तिथे फक्त दोन खाटा होत्या. एकीवर अगदी रोडावलेला रोगी झोपला होता. त्याच्या डोक्यावर बर्फाची पिशवी ठेवली होती. दुसऱ्या खाटेवरचा रोगी डोक्याला पट्ट्या बांधून, हात पसरून बिछान्यावर पडला होता.

पाश्काला बिछान्यावर बसवून नर्स परत गेली. लगेचच त्याच्यासाठी इस्पितळाचे कपडे घेऊन आली. "ऊठ," ती म्हणाली, "हे कपडे घाल." स्वच्छ सदरा आणि लेंगा घालताना पाश्काला अतिशय आनंद झाला. हे कपडे आपल्या गावातल्या पोरांनी बघितले तर नक्कीच ते आपला हेवा करतील, असे पाश्काला वाटले.

जराशाने नर्स परत आली. तिने दोन मोठे वाडगे, दोन चमचे आणि पावाचे दोन काप आणले.एक वाडगा तिने म्हाताऱ्याला दिला आणि दुसरा पाश्काला. "जेवा," ती म्हणाली. वाडग्यात मटनाचा एक तुकडा



आणि बाकीचा तुपकट रस्सा होता. पाश्काने रस्सा संपवला. मटनाचा तुकडा तोंडात धरून तो चव घेत घेत खाल्ला. नंतर उरला पाव. त्याच्याबरोबर तोंडीलावणे काही नव्हते. पण तो देखील पाश्काने संपवला. तेवढ्यात नर्स आणखी दोन वाडगे घेऊन आली. त्यात शिजवलेले मांस आणि बटाटे होते. "तुझा पाव कुठे आहे?" तिने पाश्काला विचारले. त्याने तो खाऊन टाकल्याची खूण केली. ती म्हणाली, "छान! पाव गिळून टाकलास. आता जेवण कशाबरोबर जेवशील?" तिने परत जाऊन आणखी पाव आणला. तोपर्यंत पाश्काने वाडग्यातले जेवण सफाचट केले होते. शेजारच्या म्हाताऱ्याने पाव आपल्या टेबलाच्या खणात ठेवला. पाश्काला वाटले, आपण देखील तसे करावे. पण पोटात भूक होतीच. तो दुसरा पाव देखील त्याने खाऊन टाकला. असे चांगले जेवण पाश्काला कधीही मिळाले नव्हते.

पोट भरल्यावर त्याच्या पायात जोर आला. तो हिंडायला निघाला. शेजारच्या वॉर्डमध्ये चौघे रोगी होते. एकजण बिछान्यावर बसून एकसारखा डोके हलवत होता. त्याचे हात घड्याळाच्या लंबकासारखे इकडून तिकडे झोके घेत होते. ते पाहून पाश्काला प्रथम हसू आले. त्या माणसाच्या भकास चेहऱ्याकडे पाहिल्याबरोबर मात्र त्याच्या लक्षात आले की ही गंमत नव्हे, हा आजार आहे. तिथून तो तिसऱ्या वॉर्डमध्ये गेला. तिथे दोन रोगी होते. त्यांच्या लालसर चेहऱ्यावर कसला तरी लेप लावलेला होता. नर्स तिथे आली. तिला पाश्काने विचारले, "मावशी, त्यांना काय झालंय?" "देवी आल्यात बेटा. तू पळ जा इथून," ती म्हणाली.

पाश्का आपल्या खाटेकडे परतला. त्याच्या शेजारचा म्हातारा खोकतच होता. त्याच्या श्वासाचा 'सूं, सूं' असा आवाज येत होता. पाश्काने विचारले, "आजोबा, तुमच्या छातीत कशाचा आवाज होतोय?" म्हाताऱ्याने उत्तर दिले नाही. मग पाश्काला आठवले की डॉक्टर आपल्याला कोल्हा दाखवणार होते. तो म्हणाला, "आजोबा, कोल्हा कुठे आहे?" म्हातारा म्हणाला, "कुठला कोल्हा?" "जिवंत कोल्हा!" पाश्काने सांगितले. "जिवंत कोल्हा जंगलात असतो," म्हातारा म्हणाला.

हळूहळू संध्याकाळ जवळ आली. दिवे लागले. नर्सने चहा आणला. पाव आधीच खाऊन टाकल्याबद्दल ती पाश्काला रागावली. पाश्का डॉक्टरांची वाट पाहात होता, पक्षी पकडायला जाण्यासाठी. पण ते आले नाहीत. डोक्यावर बर्फाची पिशवी ठेवलेल्या रोग्याकडे कंपाऊंडर आला. त्याने रोग्याला हाक मारली, "मिखेलो!" पण मिखेलोने उत्तर दिले नाही. सगळे शांत झाले. मोठे दिवे विझून रात्रीचे मंद दिवे लावले गेले. ऊबदार पांघरूणाखाली घुसून पाश्का विचार करायला लागला. एका

अंधाऱ्या खोलीचे त्याचे घर, नेहमी त्रासलेली आजी, त्याच्या आईचा मलूल चेहरा, हे सगळे त्याच्या मनात एकवटले. आईच्या आठवणीने त्याला एकटे वाटू लागले. ' पण ती उद्या सकाळी येणार आहे,' अशी स्वतःशी समजूत घालून तो झोपी गेला.

रात्र बरीच झाली होती. पाश्काला जाग आली. शेजारच्या वॉर्डमध्ये काहीतरी गडबड चालली होती. तीनचार माणसे मिखेलोच्या खाटेभोवती जमली होती. कोणीतरी म्हणाले, ''रात्री मोठ्या अडचणीच्या वेळी मरण आलं ह्याला. ईश्वर त्याच्या आत्म्याला शांती देवो!'' एकाने मिखेलोचे खांदे धरले, दुसऱ्याने पाय. डोक्याला पट्ट्या बांधलेला रोगी मदतीला उठला. त्या तिघांनी मिखेलोचे शव बाहेर नेले. पाश्काच्या शेजारच्या खाटेवरच्या रोग्याची छाती जोरजोराने वाजत होती. तो 'सूं सूं सूं' आवाज त्याला ऐकवेना.

पाश्का खूप घाबरला.त्याने सभोवतालच्या खिडक्यांवर नजर टाकली. बाहेर काळाकुट्ट अंधार होता. "आई, आई ग!" पाश्का मोठ्याने किंचाळला. खाटेवरून उडी मारून धावत शेजारच्या वॉर्डमध्ये घुसला. मिखेलोच्या मृत्यूने अस्वस्थ झालेले रोगी आपापल्या बिछान्यात उठून बसले होते. मंद उजेडात पाश्काला ते रोगी भयानक दिसले. पाश्का देवीच्या रोग्यांच्या वॉर्डमधून पळत गेला. वॉर्डमधून बाहेर पडून जिन्याकडे आला आणि भराभर खाली उतरला. सकाळी तो बसला होता ते दालन त्याने ओळखले. तिथून तो दरवाजाकडे धावला. धडपडत, त्याने कडी उघडली आणि अंगणात आला. बाहेर थंडगार, बोचरा वारा त्याला झोंबत होता. पण त्याच्या डोक्यात जणू घंटा वाजत होती, त्याला म्हणत होती, "पळ इथून, पळ घराकडे."

रस्ता कुठे आहे ते त्याला ठाऊक नव्हते. पळत सुटलो की घरी पोहोचू एवढेच त्याच्या डोक्यात घुमत होते. ढग पांगले आणि चंद्राचा उजेड पडला. त्या उजेडात, झुडपामागे गोठ्यासारखी इमारत पाश्काला दिसली. तिच्याकडे तो धावला. चुकलो की काय असे वाटून पुन्हा इस्पितळाच्या इमारतीकडे वळला. तिला फेरा घालताना त्याला समोर दिसली दफनभूमी. तिथे थडग्यावरचे पांढरे क्रूस भुतासारखे उभे होते. तो किंचाळला, "आई, आई ग!" आणि पुन्हा इमारतीकडे पळत सुटला. त्या अंधारलेल्या इमारतीच्या एका खिडकीमधून उजेड येत होता. ते पाहून पाश्काला थोडा धीर आला. खिडकीच्या जवळच एक दरवाजा आणि वर चढायला पायऱ्या होत्या. पाश्का धडपडत पायऱ्या चढून वर गेला आणि खिडकीच्या काचेतून त्याने आत नजर टाकली. सकाळचे डॉक्टर तिथे टेबलाशी बसून पुस्तक वाचत होते. ते बघून पाश्काच्या आनंदाला उधाण आले. तो मोठ्याने हसला. त्याने ओरडायचा प्रयत्न केला पण त्याचा श्वास बाहेर निघेना. त्याचे पाय लटपटले. घेरी येऊन तो खाली

कोसळला आणि त्याची शुद्ध हरपली.

पाश्का शुद्धीवर आला तेव्हा चांगलेच उजाडले होते. ज्या डॉक्टरांनी त्याच्या मनात जत्रेची, पाखरे पकडायची आणि कोल्हे पाहायची चित्रे कोरली होती, ते त्याच्या खाटेवर ओणवे होऊन मायेने म्हणत होते, ''पाश्का; तू अगदी गाढव आहेस! खरोखर गाढव! तुला फटकेच मारले पाहिजेत ....''

□ □ □

रानावनातला एक दिवस

आभाळ भरून आले होते. ढगांच्या पांघरूणाखाली सूर्याने पार दडी मारली होती. सकाळचे नऊ वाजायच्या बेतात होते. पण काळोख इतका दाटला, की त्या खेडेगावाला काळोखाने पार लपेटून टाकले. पाखरे आपापल्या ठिकाणी चिडीचूप बसली. सुसाट वारा घोंगावू लागला. झाडे वाकली. धुरळ्याचे लोट उडायला लागले. दूरवर ढगांचा गडगडाट सुरू झाला. मधेच एखादी वीज कडाडून चमकून जाई.

ह्या अशा वादळी काळोखात, गावाच्या मधल्या रस्त्यातून, फायोल्का सैरभैर धावत होती. केसाचे भीस, अनवाणी पाय, भीतीने कापणारे ओठ अशा अवतारातील सहा वर्षांची फायोल्का, जो कोणी वाटेत दिसेल त्याला विचारत होती, "मामा, तेरेन्ती चांभार कुठाय?" तिला कोणी उत्तर देईना. जो तो वादळातून निसटायच्या गडबडीत होता. शेवटी, सिलान्ती

सिलिच समोरून आला. तो तेरेन्तीचा मित्र होता. तो म्हणाला, "तेरेन्ती त्या झोपडीमागे, भाजीच्या वाफ्यात. शोधतोय काहीतरी."

फायोल्का झोपड्यांच्या मागे धावत गेली. कोरड्या ठणठणीत भाजीच्या वाफ्यात म्हातारा तेरेन्ती उभा होता. ढेकळांपलीकडे वाफ्यात काहीच नव्हते. तेरेन्ती आभाळाकडे पाहात होता. त्याचे लांबच लांब, रोडावलेले पाय बगळ्याच्या पायासारखे दिसत होते. अंगावर जुनापुराणा, बायका घालतात तसा, कोट होता. कोटाची फाटकी बाही ओढत फायोल्का म्हणाली, "तेरेन्ती मामा, चला लवकर. दानिल्काला अपघात झालाय." ती हुंदके देऊन रडत होती. तेरेन्तीने आपली उंच मान इवल्याशा फायोल्काकडे वाकवली. तिचे हामसाहुमशी रडे पाहून तो म्हणाला, "देवा, देवा! कसा अपघात झाला दानिल्काला? कुठे झाला अपघात?"

फायोल्का म्हणाली, "मामा, जहागीरदाराच्या वाडीकडे आम्ही सकाळी गेलो. तिथे एका झाडाच्या खोबणीत दोन अंडी दिसली. ती मला पाहिजे होती. म्हणून दानिल्कानं आत हात घातला, तर हातच अडकला, मामा. त्याचा हात मोडून जाईल, मामा. चला लवकर, सोडवा त्याला. चला, चला!" रडणाऱ्या फायोल्काच्या केसावरून हात फिरवत तेरेन्ती म्हणाला, "देवा, देवा, देवा! सकाळ उजाडली नाही तेवढ्यात तुम्हा पोरांचे घोटाळे सुरू झालेत! कशाला जाता त्या वाडीत आणि जंगलात तडफडायला? लांडगे खाऊन टाकतील तुम्हाला, एखाद दिवशी. तुमच्यासारखी अनाथ पोरं मेली तर कोणी रडणार पण नाही!" बोलता बोलता तेरेन्तीच्या म्हाताऱ्या चेहऱ्यावर मायेची छटा पसरली. छोट्या फायोल्काला तो समजावणीच्या सुरात म्हणाला, "चल, बेटा. दानिल्का कुठे अडकलाय ते दाखव मला."

जहागीरदाराची वाडी गावापासून दीड मैलावर होती. तिच्या सभोवताली दाट झाडी होती. कोरड्या ठणठणीत शेतजमिनीतून तिकडे जावे लागे. तेरेन्ती झपाझप चालू लागला. फायोल्काची लहान पावले त्याच्यामागे धावत, धडपडत जात होती. एकदम खूप मोठा गडागडाट झाला. पावसाचे टपोरे थेंब पडायला लागले. फायोल्काने पळत जाऊन तेरेन्तीचा हात पकडला. तो म्हणाला, ''भ्यालीस का वादळाला? अग, पाऊस पाहिजेच आहे. पाऊस पडेल. जमीन भिजेल. गवत उगवून येईल. नंतर थंडी, उन्हाळा, तहानलेली जमीन, पुन्हा पाऊस, हे असं चालायचंच.''

पाऊस जोरात कोसळायला लागला. कोरड्या मातीचा चिखल झाला. तेरेन्ती आणि फायोल्काचे पाय चिखलाने लडबडले. पाय ओढत, मधेच घसरत, फायोल्का कशीबशी चालत होती. झाडीत शिरल्यावर समोरच दानिल्का दिसला. तो जेमतेम आठ वर्षांचा होता. झाडाच्या बुंध्यातील

एका लहानशा पोकळीत त्याचा उजवा हात अडकला होता. दुसऱ्या हातात मळकी टोपी होती. चेहरा गंभीर करून तो झाडाला टेकून उभा होता. तेरेन्तीला पाहाताच, प्रौढ माणसाचा आव आणून तो म्हणाला, ''तेरेन्तीमामा, खूप गडगडाट होतोय नाही? माझ्या उभ्या आयुष्यात मी असा गडगडाट ऐकला नव्हता!'' तेरेन्ती म्हणाला, ''तुझं उभं आयुष्य किती झालंय ते नंतर मोजू. तुझा हात कसा अडकला?'' दानिल्का म्हणाला, ''तेरेन्तीमामा, मी पोकळीत हात घातला, तसा सैल झालेला एक ढलपा आडवा पडला. त्याच्याखाली हात अडकलाय.'' तेरेन्तीने दानिल्काचा हात ढलप्यातून सोडवला. तो खरचटून खरचटून खूप रक्ताळला होता. पण त्याकडे कोणीही लक्ष दिले नाही. सुटका झाल्याचे समाधान सगळ्यांना पुरेसे होते.

पुन्हा जोरदार गडगडाट झाला. दानिल्काने विचारले, ''तेरेन्तीमामा, गडगडाट कशामुळे होतो?'' तेरेन्तीला शिक्षणाचा गंध नव्हता. तो अंदाजानेच म्हणाला, ''एक ढग दुसऱ्यावर आपटतो तेव्हा गडगडाट होतो.''

दोन्ही मुलांबरोबर तेरेन्ती रस्त्याकडे आला. वादळ ओसरले होते. संकटातून सुटका झाल्यामुळे दानिल्का खुषीत होता. तो म्हणाला, ''फायोल्का, तुला बुलबुलाचं घरटं पाहायचं आहे?''

''बुलबुलाच्या घरट्याला हात लावू नकोस, दानिल्का,'' तेरेन्ती म्हणाला, ''चांगले गाणारे पक्षी आहेत ते. त्यांना त्रास देणं पाप आहे!''

हळूहळू ढग पांगले. आभाळाचे निळे तुकडे मधेमधे डोकावायला लागले. दानिल्का एकदम म्हणाला, ''तेरेन्तीमामा, ते बघा मुंग्यांचं वारूळ. पार कोसळलंय पावसात. कशा पळतायत, कशा पळतायत बघा त्या मुंग्या!'' तेरेन्ती हसत,हातवारे करत, मुंग्यांना म्हणाला, ''कशाला धडपडता ग एवढ्या! जराशानं ऊन पडेल आणि घर दुरुस्त होईल तुमचं!''

पाऊस पार उघडला. ढग विरून गेले. हवेत ओल्या मातीचा वास दरवळला. झाडीतल्या फुलांचा सुवासही त्यात मिसळला. ते तिघे नदीकडे निघाले. तिथे जायला रेल्वेलाईन ओलांडावी लागे. त्यांना आगगाडीची शिटी ऐकू आली. मागोमाग, "गडगड-खट्ट, गड्ड-खट्ट", असा आवाज करत मालगाडी रूळावरून धीमेपणाने निघून गेली. गाडीचे इंजिन कसे चालते त्याचे मुलांना कुतूहल होते. ती माहिती देण्याचे काम तेरेन्तीने अंगावर घेतले. "हे सगळं वाफेचं काम आहे, समजलं? चाकं फिरवणारं ते काहीसं यंत्र आहे ना, त्याला वाफ ढकलते. मग चाकं फिरतात."

असे कितीतरी प्रश्न मुलांनी नदीकडे जाताना विचारले. तेरेन्तीने त्या सगळ्यांची उत्तरे आपल्या मनाने तयार करून दिली. जगातले सगळे काही आपण जाणू शकतो अशी तेरेन्तीची ठाम समजूत होती. त्याच्या सभोवतालच्या जगातले बरेच काही तो खरोखरच चांगले जाणत होता. कोणत्या झाडपाल्याने कोणते आजार बरे होतात, मधमाशा काय करतात आणि त्यांना कसे पकडावे, घोड्यांचे वय कशावरून मोजावे, गाईचा आजार कसा बरा करावा, वगैरे सगळे काही तेरेन्तीला माहीत होते. असे ज्ञान गावातल्या बहुतेकांना होते. लिहिता - वाचता येत नसले तरी पशू - पक्षी, झाडे - नद्या - डोंगर - पिके - वारा - पाऊस ही सगळी त्यांची ज्ञान मिळविण्याची साधने होती. शेकडो वर्षांच्या निरीक्षणातून हा ज्ञानाचा ओघ त्यांच्याकडे येऊन पोहोचला होता.

चालता चालता फायोल्का खूप दमून गेली. सकाळपासून तिच्या पोटात काही नव्हते. दानिल्काला सोडवायसाठी केलेल्या धावपळीने तर तिचे पाय दमून लटपटत होते. पण करणार काय? तिला घर नव्हते. आईबाप, नातेवाईक, कोणीही नव्हते. तिच्याचसारखा अनाथ, पण तिच्यापेक्षा सशक्त असलेला दानिल्का तिने आधारासाठी भाऊ मानला होता. तेरेन्ती चांभार तिच्यावर माया करी. पण तो बहुतेक आपल्याच नादात असायचा. दानिल्का आणि तेरेन्ती सभोवतालच्या निसर्गाकडे पाहात होते. त्याबद्दल बोलत होते. थकलेली फायोल्का कशीबशी त्यांच्या मागोमाग चालत होती. बोलायचेही त्राण तिच्यात नव्हते. दुपारचे बारा वाजायला आले. नदीकाठी एक बरीशी जागा पाहून तिथे त्या तिघांनी तळ ठोकला. दानिल्काने खांद्याला अडकवलेली पिशवी काढली. आदल्या दिवशी मिळवलेले पाव तिच्यात होते. तेरेन्तीकडे काहीच नव्हते. पावसात पाव भिजून गेले होते. त्यांचे वाटे करून त्यांनी कसेतरी गिळले. तेरेन्तीने एका झाडाखालच्या कोरड्या जागी अंग टाकले

आणि तो झोपून गेला. दानिल्का नदीतले मासे, उडणारे पतंग, वळवळणारे पाणसाप पाहाण्यात गुंग झाला. फायोल्का थकून झोपली.

संध्याकाळी ते तिघेही गावाकडे परतले. मुले पडक्या गोठ्यात जाऊन तिथल्या गवतावर पडली. तेरेन्ती आपल्या मित्रमंडळींच्या अड्ड्यावर गेला. दानिल्काला झोप येईना. दिवसभर पाहिलेली अनेक दृश्ये, ऐकलेले आवाज, धुंद करणारे रानावनातले सुगंध, त्याच्या मनात तऱ्हेतऱ्हेचे खेळ खेळत होते. ते सगळे कोणाला तरी सांगावे अशी त्याला जबर इच्छा झाली. पण थकल्या भागलेल्या सहा वर्षांच्या फायोल्काला ह्यातले काही कळायचे नाही, तिला काही सांगण्यात अर्थ नाही, असे त्याच्या मनाने घेतले. जरा वेळाने तो पेंगायला लागला. झोपताझोपता मनाशी म्हणाला, "उद्या तेरेन्तीमामाला सांगेन. त्याला हे समजेल."

मुलांसारखाच बेघर असलेला तेरेन्ती अड्ड्यावरून परत आला. गुडघे टेकून त्याने ईश्वराची प्रार्थना केली. बरोबर आणलेले बरेचसे पावाचे तुकडे मुलांच्या उशाशी नीट ठेवले. त्यांच्याकडे मोठ्या प्रेमाने पाहून तो पण झोपी गेला. बेघर, अर्धपोटी तेरेन्तीचे हे प्रेम, त्याची ही माणुसकी पाहायला त्या अंधाऱ्या गोठ्यात कोणीही नव्हते. कदाचित त्याची नोंद घेतली असेल आकाशातून पोहत जाणाऱ्या चांदोमामाने. गोठ्याच्या मोडक्या छपरातून त्याचे किरण आत गेले असतील आणि मायेचा हात फिरवला असेल त्यांनी, त्या बेघर म्हाताऱ्यावर आणि अनाथ पोरांवर!

□ □ □

व्हान्काचे पत्र

नववे वर्ष नुकतेच लागलेला ईव्हान जुकॉव्ह कामाला लागला होता. त्याला सगळे व्हान्का म्हणत. त्याचा एकुलता एक आणि जवळचा नातेवाईक म्हणजे त्याचा आजा कॉन्स्तान्तिन माकेरिच. आपले वडील कोण होते त्याचा व्हान्काला पत्ता नव्हता. तो अगदी लहान होता तेव्हा त्याची आई एका सधन कुटुंबात मोलकरीण म्हणून काम करीत असे. त्याचा आजा त्या कुटुंबाच्या कारखान्यावर पहारेकरी होता. आई कामात गुंगली की व्हान्का सैरभैर व्हायचा. ते पाहून त्या कुटुंबातल्या तरुण मालकिणीने त्याचे शिक्षण सुरू केले. थोडे लेखन, वाचन आणि शंभरापर्यंत अंक मोजणे एवढे व्हान्का तिच्याकडून शिकला. जेव्हा व्हान्काची आई आजारी पडली आणि वारली तेव्हा व्हान्काचे काय करायचे असा प्रश्न उभा राहिला. काही दिवस तो तिथेच स्वैपाकघरात

मदतीला राहिला. पण ते त्याच्याजोगते काम नव्हते. मॉस्कोच्या अलियाखीन चांभाराशी त्याच्या आजाची थोडी ओळख होती.त्यामुळे अलियाखीनच्या हाताखाली चांभारकाम शिकायला व्हान्काची रवानगी झाली. व्हान्का कामाला लागला. त्याच्या पोटापाण्याची जबाबदारी त्याच्याच लहानग्या खांद्यांवर येऊन बसली.

अलियाखीनकडे व्हान्का आला तेव्हा मॉस्कोत थंडी चांगलीच पडायला लागली होती. येऊन तीन महिने होतात न होतात तोच ख्रिसमसचा सण जवळ येऊन ठेपला. तोपर्यंत व्हान्का कसातरी धीर करून काम करत होता. अलियाखीनच्या हातून तो रोज सपाटून मार खाई. ह्यातून आपली कधीतरी सुटका होईल, ख्रिसमस सणासाठी आजोबा न्यायला येतील, अशा आशेवर तो दिवस काढत होता. ख्रिसमसच्या आदल्या रात्री मात्र त्याचा धीर सुटला. त्याने आजोबाला पत्र लिहायचे ठरवले.

रात्री चर्चमध्ये प्रार्थना होती. अलियाखीन, त्याची बायको आणि दुकानातले मदतनीस प्रार्थनेसाठी गेले. व्हान्काने मालकाच्या फडताळातून शाईची दौत आणि एक जुनाट टाक काढला. त्या दिवशी त्याने कोणीतरी टाकून दिलेला, चुरगळलेला, एक कागद उचलून आणला होता. तो नीट सपाट करून त्याने बाकावर ठेवला. गुडघे टेकून तो आजोबाला पत्र लिहायला बसला. अलियाखीन लवकर परत येईल की काय अशी भीती त्याला वाटत होती. त्याने प्रथम दाराकडे पाहिले. तिथे कोणी नव्हते. खिडकीकडे पाहून तिथे कोणी नसल्याची खात्री करून घेतली. अर्धवट शिवलेले बूट, चामड्याचे तुकडे, चांभारकामाची अवजारे फळीवर मांडलेली होती. तिकडे पण त्याने नजर वळवली. असहायपणाच्या जाणिवेने त्याच्या छातीत हुंदका भरुन आला. तो दाबून त्याने एक उसासा टाकला आणि लिहायला सुरुवात केली. ‘‘प्रिय आजोबा कॉन्स्तान्तिन

माकेरिच, मी आज तुम्हाला पत्र लिहितो आहे. कारण मला आई नाही, वडील नाहीत. तुम्ही माझे सर्वस्व आहात. ख्रिसमसचा सण तुम्हाला आनंद देणारा ठरो. देवाची पवित्र कृपा तुमच्यावर राहो.''

व्हान्काने पुन्हा खिडकीकडे पाहिले. मेणबत्तीचे प्रतिबिंब खिडकीच्या काचेवर डुलत होते. तिकडे पाहताना त्याला पेंगुळल्यासारखे झाले. नजरेसमोर आजोबा दिसायला लागले : लहानखुरा, रोड पण तरतरीत, पासष्ट वर्षांचा म्हातारा. सदा हसतमुख, रात्री झोप न मिळाल्याने पाणावलेले डोळे. व्हान्काचे हे आजोबा दिवसभर मालकाच्या वाड्याच्या स्वयंपाकघरात डुलक्या खात बसायचे. स्वैंपाक्याला, मोलकरणींना गमतीजमती सांगायचे. रात्र झाली की मेंढ्यांच्या कातड्याचा जाडजूड कोट अंगावर चढवायचे. हातातला दंडुका जमिनीवर आपटत, वाड्याच्या आणि कारखान्याच्या भोवती ते पहारा द्यायचे. त्यांच्या मागे मागे जात

असे काष्तांका नावाची कुत्री आणि वियून नावाचा काळाशार, लांबट शरीराचा कुत्रा. वियून दिसायला शांत पण स्वभावाने मोठा जहरीला होता. कुणी अनोळखी माणूस आसपास आला तर त्याच्या घोट्याचा तो कडकडून चावा घेई. रात्रीबेरात्री जवळपासच्या शेतकऱ्यांच्या कोंबड्या तो बिनदिक्कत पळवून नेई.

व्हान्काला वाटले, की ह्या थंडीत गरम कोट घालून आजोबा गावातल्या चर्चकडे गेले असतील. फाटकाजवळ घुटमळणाऱ्या लोकांबरोबर ते थट्टा - मस्करी करत असतील. बर्फ पडताना वापरायचे उंच बूट जमिनीवर आपटून पाय मोकळे करत असतील. कमरबंदात अडकवलेला दंडुका हाताने चाचपत, जरा खोकत, येणाऱ्या जाणाऱ्या बायकामाणसांना आपली तपकिरीची डबी दाखवून म्हणत असतील, "घ्या की थोडी! थंडीनं गारठलेलं नाक गरम होईल." कुणी बाई तपकिरीच्या मोहात पडून शिंकायला लागली की आजोबा खदखदून हसत असतील. कधीकधी आजोबा आपल्या कुत्रा - कुत्रीला पण तपकीर देत. काष्तांकाला शिंका आल्या की ती रागाने दूर सरायची. वियून तर तपकीर पाहून दूर पळायला लागायचा. रात्रीच्या नितळ निळ्या आकाशात तारे चमकत असायचे. घरांच्या उतरत्या छपरांवर पांढरेफेक बर्फ आंथरलेले असायचे. स्वैपाकघरातला धूर छपरातून बाहेर पडायचा आणि अलगदपणे हवेत विरायचा. झाडे चंदेरी दिसायची ......

व्हान्काने आपले गावाकडे धावणारे मन मागे ओढून घेतले. तो पुन्हा लिहू लागला, "काल रात्री मला मालकानं खूप मारलं. त्यांच्या बाळाला झोके देत बसायला मला सांगितलं होतं. पाळणा हलवताना मला झोप लागली. मालकानं मला अंगणात फरफटत नेलं आणि चामड्याच्या वादीनं फटके मारले. त्याआधी मालकिणीनं मला मासा साफ करायला सांगितला होता. मी तो तोंडाऐवजी शेपटाकडून साफ करायला लागलो

म्हणून ती संतापली. माशांचे खवले तिनं माझ्या चेहऱ्याला चोळले. मालकाचे गडी मला दारू आणायला पाठवतात. मालकाच्या वेलावरच्या काकड्या ते खाऊन टाकतात. माझ्यावर ते आळ घेतात. मग मालक हातात जे सापडेल ते घेऊन मला मारतो. जेवायला म्हणून काही मिळतच नाही. सकाळी पाव, दुपारी पेज, संध्याकाळी पुन्हा पाव. मालक - मालकीण मात्र सारखा चहा घेतात. कोबीचा रस्सा चापतात. मला त्यांच्या बाळाच्या पाळण्याजवळ झोपायला लावतात. ते रात्री रडत उठलं की पाळणा हलवून त्याला गप्प करावं लागतं. त्यामुळे मला रात्रभर झोप नसते. आजोबा, प्रिय आजोबा, मला आता हे सहन होत नाही. दया करा आणि मला गावी परत न्या. मी लोटांगण घालतो तुमच्यासमोर, नाक घासतो. देवाच्या दयेखातर मला घेऊन जा. नाहीतर मी इथंच मरून जाईन.''

व्हान्काला दुःख अनावर झाले. तो ढसढसा रडायला लागला. डोळ्यावर मुठी चोळून त्याने रडे थांबवले. पत्र पुढे सुरू केले, ''आजोबा, मी तुमचा तंबाखू कुटून देत जाईन. माझं काही चुकलं तर तुम्ही मला मारा. गावाला आलो की मी कुठेही काम मिळवेन. मी कारखान्याच्या मॅनेजरचे बूट साफ करेन. मी शेळ्या - मेंढरं चारायला जाईन. आजोबा, इथं राहणं मला आता सहन होत नाही. लोक माझा जीव घेतील. मी गावाकडे पळून आलो असतो पण मला घालायला बूट नाहीत. ह्या बर्फात बुटाशिवाय चालायची भीती वाटते. आजोबा, मी मोठा झालो की तुमची काळजी घेईन. तुम्हाला जेव्हा कधी मरण येईल तेव्हा तुमचा आत्मा शांत राहावा म्हणून मी प्रार्थना करेन. माझी आई वारली तेव्हा मी केली होती, तशीच मनापासून प्रार्थना करीन.

आजोबा, मॉस्को खूप मोठे शहर आहे. इथे मोठ्या लोकांची घरं आहेत. शेळ्या - मेंढ्या नाहीत. घोडे बरेच आहेत. आपल्या गावात ख्रिसमसच्या सणामध्ये मुलं गाणी म्हणत हिंडत असतात, तसं इथे नाही. इथल्या दुकानात मासे पकडायचे गळ मिळतात. बंदुका पण मिळतात दुकानात. तशी एक बंदूक तुमच्या मालकाकडे आहे. किमान शंभर रुबल तरी किंमत असेल तिची. इथल्या खाटकाच्या दुकानात ससे, रानकोंबडे, आणि होले देखील असतात. त्यांची शिकार कोण करतं, ते कुठून येतात, ते मात्र खाटीक सांगत नाहीत. आजोबा, तुमच्या मालकाकडे ख्रिसमसच्या झाडावर बक्षिसं टांगली की तुम्ही माझ्यासाठी एक अक्रोड काढून ठेवाल? माझा हिरवा डबा आहे ना, त्याच्यात तो ठेवा.''

व्हान्काला पुन्हा रडू कोसळले. ख्रिसमसकरता ''फर'' चे झाड आणायला तो आजोबांबरोबर जंगलात जात असे. लहानसे झाड कापून ते ओढत ओढत धन्याच्या घराकडे नेताना किती मौज यायची!

व्हान्काने पत्र पुढे चालू केले : ''आजोबा, लवकर या. ह्या अनाथ पोराला इथून घेऊन जा. इथे सगळे मला मारतात. मी सतत उपाशी असतो. मला अजिबात करमत नाही. मला एकसारखे रडू येते. परवा मालकाने माझ्या डोक्यावर फटका मारला. मी भोवळ येऊन खाली पडलो. आजोबा, इथे माझं जिणं कुत्र्यापेक्षाही वाईट आहे.

आजोबा, तिथल्या गाडीवानाला, इतर सगळ्यांना माझा नमस्कार सांगा. माझा तोंडानं वाजवायचा बाजा तिथंच आहे. तो कोणाला देऊ नका. आजोबा, या लवकर. तुमचा नातू : ईव्हान जुकॉव्ह.''

व्हान्काने पत्राच्या कागदाची चौकोनी घडी घातली. आदल्या दिवशी त्याने पाच कोपेक खर्च करून एक पाकीट विकत घेतले होते. त्यात पत्र घालून त्याने पाकीटावर लिहिले : ''आमच्या गावी, माझ्या आजोबांना देणे.'' मग थोडा विचार करून त्याने खाली लिहिले : ''कॉन्स्तान्तिन माकेरिच, यांना.'' मालक परत येण्याआधी पत्र पूर्ण केल्याच्या आनंदात व्हान्का उठला. बाहेर खूप थंडी होती. त्याने डोक्यावर टोपी घातली. पण गडबडीत तो कोट न घालताच धावत घराबाहेर पडला. त्याने पत्र कुठे टाकतात ते जवळच्या कोंबडीवाल्या दुकानदाराला सकाळीच विचारुन घेतले होते. पोस्टाच्या पेटीत पत्र टाकतात, तिथून ते पोस्टाचे लोक काढून घेतात, जगात कुठेही ते पत्र पोहोचू शकते, अशी माहिती त्याने व्हान्काला दिली होती. व्हान्काने जी पोस्टाची पेटी प्रथम दिसली तिच्यात आपले जिवाच्या आकांताने लिहिलेले, आजोबा येतील अशा आशेने ओथंबलेले पत्र टाकले. धावतच तो परत आला.

त्या रात्री व्हान्काचे मन अलियाखीनच्या जाचातून सुटका होण्याच्या आशेने भारावून गेले होते. त्याला गाढ झोप लागली. झोपेत त्याला दिसत होते आजोबा, शेकोटीजवळ बसलेले. व्हान्काचे पत्र मोलकरणींना, स्वैपाक्याला वाचून दाखवत बसलेले आजोबा. वियून कुत्रा शेपूट हलवत तिथेच आजोबांजवळ घोटाळत असलेला ....

□ □ □

गुप्तधन

रात्र सरत आली होती. मावळत्या चांदण्यांचा अंधुक प्रकाश अफाट गवताळ रानावर पसरला होता. गवताच्या त्या प्रदेशातून मधोमध जाणाऱ्या हमरस्त्याच्या एका कडेला दोन मेंढपाळ झोपले होते. जरा पलीकडे, त्यांच्या मेंढरांचा मोठा कळप झोपेत गुंग झाला होता. एक मेंढपाळ म्हातारा होता. सुमारे ऐंशी वर्षाचा, दात पडलेला. तो हाताच्या घडीवर डोके ठेवून झोपला होता. दुसरा मेंढपाळ तरुण होता. तो पाठीवर झोपून आकाशातल्या चांदण्यांचा गारवा अनुभवत होता.

मेंढपाळांच्या पलीकडे, अंधारलेल्या रस्त्यावर, घोड्याची आकृती अस्पष्ट दिसत होती. घोड्याला टेकून, शिपाईबाण्याचा, खानदानी वाटणारा गृहस्थ उभा होता. काही क्षणात पूर्वेकडचे आभाळ उजळू लागले. दूरवर

कुठेतरी पाखरांनी शीळ घातली. मेंढरे जागी झाली. मेंढपाळ उठले. घोडेस्वाराने चिलमीसाठी त्यांच्याकडून विस्तव घेतला. ती ओढून संपेपर्यंत तो तसाच, शब्दही न बोलता, घोड्याच्या जिनावर कोपर टेकून, विचारात गढल्यागत उभा होता. म्हाताऱ्या मेंढपाळाने त्याला ओळखले आणि विचारले, "तुम्ही माकारॉव्हाच्या जहागिरीवर देखरेख करणारे निरीक्षक पान्तले का?" "होय. मीच तो!" घोडेस्वार म्हणाला.

"मी तुम्हाला कधी पाहिलेलं नसूनही ओळखलं. ह्याचा अर्थ असा की तुम्हाला खूप धन दौलत मिळणार आहे. तुम्ही आलात कोठून?"

"कोव्हिलियेवस्कीच्या शेताकडून," घोडेस्वार उत्तरला.

इतक्यात मेंढपाळांच्या कुत्र्याला चेव आला. तो भला थोरला कुत्रा जोराने भुंकत घोडेस्वाराचा चावा घेण्यासाठी धावला. म्हातारा मेंढपाळ कुत्र्यावर ओरडला, "अरे, मूर्ख कुठला!" कुत्रा शांत झाल्यावर तो पुढे म्हणाला, "त्या कोव्हील्यी गावचा येफीम झेमन्या मेला काही दिवसांपूर्वी, ठाऊक आहे तुम्हाला?"

"नाही!" घोडेस्वाराने लक्ष नसल्यासारखे उत्तर दिले. मेंढपाळाने चऱ्हाट पुढे चालू ठेवले, "तिथल्या लोहाराचा तो चुलता. मी त्याला साठ वर्ष ओळखत होतो. तो कधी फारसं बोलायचा नाही की इतर बाप्यासारखा गुत्त्यात जायचा नाही. बायकी कामं करायचा; मधमाशा पाळायचा, भाजीपाला काढायचा, नदीकाठी काकड्या अन् कलिंगडं घ्यायचा. म्हाताऱ्या बायकांशी थोड्या गप्पागोष्टी करायचा. ते पाहून आमची खात्री झाली की त्याला सैतानानं धरलेलं असावं. त्याची कलिंगडं म्हणे शीळ घालायची रात्रीच्या वेळी! एकदा त्यानं पकडलेला मासा 'हो, हो' करून हसला होता!" "असं घडतं कधीकधी," घोडेस्वार पान्तले वेगळाच काही विचार करत म्हणाला.

तरुण मेंढपाळाने हलकेच विचारले, "आजोबा, कलिंगडांची शीळ

ऐकली होती का तुम्ही?''

म्हातारा मेंढपाळ एक उसासा टाकून म्हणाला, ''नाही. मला हे काही लोकांनी सांगितलं. त्याचं काय आहे की सैतानानं एखाद्या दगडाचा ताबा घेतला तर दगड देखील बोलतो! एकदा मी नदीच्या काठानं जात होतो. वादळी वारा सुटला होता. दाट झुडपात मला एक पांढरा सफेद बैल दिसला. मी भराभर चालत जवळ गेलो. पाहातो तर बैल तिथे नव्हताच. तिथे उभा होता येफिम. बैलाचं रूप त्यानंच घेतलं होतं!''

''असं घडतं कधी कधी!'' विचारात गढलेला पान्तले म्हणाला.

''अहो, आणखी चारपाच वर्षात गावाची खात्री झाली की येफिमच्या अंगात सैतानानं घर केलंय म्हणून. गावकऱ्यांनी त्याला चांगला झोडपला. काही दिवसांनी गावात घशाचा रोग फैलावला. येफिमचंच काम ते. खूप लोक मेले घशाच्या रोगानं! येफिमनं सूड घेतला गावकऱ्यांवर.'' ''येफिमनं रोगराई कशी काय पाठवली गावात?'' तरुण मेंढपाळाने विचारले. ''रोगराई पसरवायला फार मोठी हुशारी लागते थोडीच? विषारी सापाची चरबी वापरली असणार त्यानं. ह्या चरबीचा दुरुन वास आला तरी लोक मरतात म्हणे!'' ''असं ऐकलंय खरं!'' घोडेस्वाराने सांगितले.

"गावातले तरणेताठे गडी येफिमला ठार करणार होते. पण म्हाताऱ्यांनी त्यांना अडवलं. त्याचं कारण असं, की गुप्तधन कुठे सापडेल ते येफिमला माहीत आहे अशी त्यांना खात्री वाटत होती. नदीकाठच्या जंगलातून जाताना खडकाच्या तळाशी लहान ज्वाळा पेटायच्या अन् लगेच विझायच्या. त्या ज्वाळा म्हणजे येफिमचंच बदललेलं रूप असंच सगळे म्हणत. गुप्तधन शोधण्यासाठी त्यानं घेतलेलं ते रूप. त्याला सापडली होती म्हणे धनाची जागा. पण कोणालाही तिची माहिती न देताच येफिम मरुन गेला." "ह्या भागात बरंच गुप्तधन आहे म्हणतात!" घोडेस्वाराने म्हाताऱ्या मेंढपाळाला पाठिंबा देत म्हटले.

हे संभाषण होत असताना पूर्वेकडचे आकाश चांगलेच उजळले आणि चांदण्या पार मावळल्या. म्हातारा म्हणाला, "गुप्तधन नेमकं कुठे पुरलेलं आहे ते कोणालाही नीट माहीत नाही. ते खणून काढण्याचाही कोणी आजपावेतो प्रयत्न केलेला नाही. गुप्तधनावर मंत्र घातलेला आहे. तो मंत्र बाजूला सारण्यासाठी येफिम वेगवेगळे ताईत बनवत असे. काही जुन्या पुराणातही इथल्या गुप्त धनाबद्दल लिहिलेलं आहे असं जुने लोक सांगतात. गावातल्या एका सैनिकाला काही जुनं लिखाण सापडलं होतं आणि त्यात गुप्तधन कुठे पुरलं आहे, कशा आकाराच्या भांड्यात, त्यात किती वजनाचं सोनं आहे, ते सगळं लिहिलेलं होतं. पण गुप्तधनावर मंत्र घातलेला असल्यानं त्या सैनिकाला ते मिळालं नाही. त्याच्याकडे मंतरलेला ताईत नव्हता."

तरुण मेंढपाळाने विचारले, "आजोबा, तुम्ही का शोधत नाही ते गुप्त धन?" "अरे, मंतरलेला ताईत लागतो त्यासाठी! माझ्याजवळ तो कुठे आहे?" म्हाताऱ्याने खुलासा केला. नंतर जरा वेळ तो गप्प बसला. त्याच्या मनात मात्र खूप खळबळ माजली होती. आपल्याशीच काहीतरी

पुटपुटत तो हातवारे करत होता. शेवटी तो कडवटपणाने म्हणाला, “संपत्ती बरीच आहे इथे जवळपास, जमिनीत गाडलेली. काय उपयोग अशा संपत्तीचा? ती सापडली तर सगळ्यांचा फायदा होईल. आपल्यासारख्या गरीब मेंढपाळांना आणि शेतकऱ्यांना त्यातून काही मिळेल की नाही, कोणास ठाऊक? श्रीमंत जमीनदार नक्कीच मजूर लावून जमीन खणतील, सरकारही तेच करील. आपल्यासारखे गरीब कोरडे राहातील. असं धन तुझ्यामाझ्यासाठी नाही!” म्हातारा चिडून बोलत होता.

पान्तले हे सगळे शांतपणे ऐकत होता. त्याच्या चेहऱ्यावर कुतूहल होते. त्याने म्हाताऱ्याकडे रोखून पाहिले. त्या नजरेला नजर देत म्हातारा म्हणाला, “माझ्या वडिलांनी आणि थोरल्या भावानं-इलिया त्याचं नांव -त्यांनी गुप्तधनाचा शोध घेतला. त्यांनी प्रयत्न केला. नाही असं नाही! इलियाला एका साधूनं सांगितलं की तागानरोगच्या किल्ल्यात, तीन दगडांखाली गुप्तधन सापडेल. ताईत बनवून विकणारा एक आर्मेनिअन माणूस त्या साधूच्या माहितीचा होता. माझा भाऊ इलिया आणि तो साधू मंतरलेला ताईत घेऊन त्या जागी गेले. तिथे म्हणे एक सैनिक पहारा देत उभा होता.”

एवढे बोलणे होईपर्यंत सूर्य वर आला. आकाशगंगा केव्हाच विरघळून गेली होती. पहाटेचा वारा वाहू लागला आणि गवताच्या रानाची हालचाल सुरू झाली. तिकडे पाहात पान्तले म्हणाला, “असं घडतं खरं! आपलं कोपर किती जवळ असतं आपल्या - पण त्याचा चावा कधी घेता येतो का? संपत्तीचं तसंच आहे. ती जवळपास असते पण हातात येणं कठीण!” म्हाताऱ्याकडे वळून तो जरा उपहासाने म्हणाला, “सुखसमाधान म्हणजे काय ते समजण्याआधीच बहुतेक

माणसं जगाला रामराम ठोकतात. आपलं आता वय झालं. आपण कशाचीही आशा करण्यात हशील नाही. तरुण मंडळींना कदाचित सापडेल गुप्तधन, गुप्त सुखसमाधान!''

पान्तलेने त्या शेकडो मैल पसरलेल्या गवताळ रानाकडे नजर टाकली. शतकानुशतके ती राने तिथेच वसली होती. ती तिथेच मरण पावत. तिथेच पुन्हा पुन्हा उगवून हिरवीगार होत. त्या विशाल रानापलीकडे दूरवरच्या धुक्यातून डोकवणाऱ्या टेकड्याही काळाची पर्वा न करता हजारो वर्षे निश्चल उभ्या होत्या. पान्तले म्हाताऱ्याला म्हणाला, ''किती दूरवर हे रान पसरलंय पाहा! ह्यात गुप्त धन कुठे शोधायचं? एक गोष्ट मात्र मला आठवते. काही जुन्या सैनिकांनी सांगितलेली. सम्राट पीटरच्या काळात त्या पलीकडच्या टेकड्यातल्या खिंडीतून एक सरकारी तांडा सोन्याच्या विटा घेऊन वोरोनेझ बंदराकडे निघाला होता. सम्राट पीटरला काही जहाजं बांधून घ्यायची होती म्हणून हे सोनं पीटर्सबर्गहून वोरोनेझकडे जात होतं. सरकारी तांडा खिंडीतून जात असताना त्यावर दरोडेखोरांनी हल्ला केला. सोनं लुटून जवळच पुरुन ठेवलं. नंतर ते त्यांना सापडेना. आणखी असंच धन कोझॅक टोळ्यांनी तिथे पुरलं आहे म्हणतात. फ्रेंच प्रवाशांकडून लुबाडलेलं सोनं - चांदी त्यांनी तिथेच कुठेतरी पुरल्याचं जुने सैनिक सांगतात.'' म्हातारा म्हणाला, ''मी देखील ऐकलं आहे ह्या पुरलेल्या धनाबद्दल.'' पान्तलेने दूरवरच्या टेकड्यांकडे नजर वळवली. तो स्वतःशीच जरासा हसला आणि घोड्यावर स्वार होऊन पुढे निघाला.

म्हातारा मेंढपाळ आणि त्याचा नातू विचार करायला लागले. म्हातारा उठला. आकडी लावलेली लांब काठी हातात घेऊन मेंढरांच्या कळपाकडे पाहात उभा राहिला. त्याचा नातूही आपली आकडी घेऊन त्याच्याजवळ आला. पहाटे ऐकलेले संभाषण त्याच्या मनात अजून गोल

गोल चकरा मारत होते. त्याने विचारले, "आजोबा, तुमच्या भावाला तो गुप्तधनाची राखण करणारा सैनिक दिसला, त्यानंतर काय झालं?" म्हातारा वेगळाच काही विचार करत नातवाला म्हणाला, "सांका, मला वाटते की जे जुने लिखाण सापडले होते त्या गुप्त धनाबद्दल, त्यात धनाची जागाही दाखवली होती. ही गोष्ट मी पान्तलेपासून लपवून ठेवली. ती जागा एका घळीत आहे. घळीतला ओढा खालच्या अंगाला तीन लहान प्रवाहात विभागलेला आहे. त्यामुळे तिथली जमीन कोंबड्याच्या पायासारखी दिसते. त्यातल्या मधल्या पट्ट्यातली जागा त्या लिखाणात दाखवलेली होती." सांका म्हणाला, "आजोबा, तुम्ही खणणार का तिथे?" म्हाताऱ्याने अवस्थपणे म्हटले, "बघू या! नशिबाची परीक्षा घ्यायला हरकत नाही." "गुप्तधन मिळालंच तर तुम्ही त्याचं काय करणार?" सांकाने विचारले. "काय करणार? आधी सापडू तर दे!

मिळालंच तर मी दाखवीन सगळ्यांना माझा तोरा. पण ते सापडल्यावर बघू काय करायचं ते. आताच ते कसं समजणार?'' म्हातारा उत्साहाने बोलत होता.

सांकाच्या मनात अनेक प्रश्नचिन्हे उभी राहिली. माणसे म्हातारपण आल्यावरही धनदौलतीचा सोस का बाळगतात? थोड्याच वर्षात, कदाचित थोड्या दिवसातही, आपण ह्या जगाचा निरोप घेणार आहोत, ह्याची जाणीव नसते का त्यांना? सांकाला उत्तरे सापडेनात. आजोबांकडून उत्तरे मिळतील असेही त्याला वाटेना. त्याला गुप्तधनदौलतीचे आकर्षण वाटत नव्हते. पण त्याला हे देखील कळेना की माणसाचे सुखसमाधान कशात सामावलेले असते!

दिवस वर आला. दोघे मेंढपाळ आपल्या कळपाच्या दोन बाजूंना आकड्या घेऊन उभे राहिले. एक आघाडीला दुसरा पिछाडीला. दोघेही विचारात गढले होते. आजोबा गुप्तधनाची स्वप्ने पाहात होता. नातू सुखसमाधान म्हणजे काय त्याचा शोध घ्यायला बघत होता. मेंढरे शांतपणे वाटचाल करू लागली. जणूकाही ती देखील विचार करत होती, सुखसमाधानाच्या गहन प्रश्नाचा, त्याची उत्तरे शोधण्याचा.

□ □ □